# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.


जा.क्र.मनपा/कर/ /२३-२४ दि. / /२०२४

प्रति,
सिस्टीम मॅनेजर
संगणक विभाग

विषय :- मा. प्रशासकिय ठराव क्र. ३९५ दि. १/३/२४ ची अंमल बजावणी करणे बाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कराचा नियमीत व विहित मुदतीत कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देण्यासाठी आगाऊ कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना सवलत देणे गरजेचे आहे.

त्याअनुषंगाने आगाऊ मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मधील तरतुदीनुसार सन २०२४-२५ या वर्षात मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर विहीत मुदतीत मालमत्ता कराचा संपूर्ण कराचा भरणा करणाऱ्या नागरीकांना खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे सवलत (सुट) देणेकरीता मा. प्रशासकिय ठराव क्र. ३९५ दि. ०१/०३/२०२४ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे.

| अ. क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी चालु वर्षात करामध्ये (२४-२५) |
|---|---|---|---|
| १ | दि. ०१/०४/२४ ते दि. ३०/०६/२४ पर्यंत | मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकरचरा शुल्क वगळुन इतर सर्व करांवर | ५% |
| २ | दि. ०१/०७/२४ ते दि. ३१/०७/२४ पर्यंत | | ३% |

वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार विहीत कालावधीत मालमत्ता कराचा भरणा करण्याऱ्या नागरीकांना मालमत्ता करात सवलत देणे करीता मालमत्ता कराच्या संगणकीय आज्ञावलीत उचित बदल करण्यात यावे. तसेच सवलत दिलेल्या रककमेचा दैनंदिन तपशिल व चलन स्वतंत्र जनरेट करण्याची तरतुद करण्यात यावी.

(संजय शिंदे)
उप-आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकिय ठराव दि. ७ /३ /२०२४

प्रकरण क्र. ३६५:- संपुर्ण मालमत्ता कराचा आगाऊ भरणा केल्यास चालु वर्षाच्या करावर सुट देणे बाबत.

### कार्यालयीन प्रस्ताव

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विकासकामे तसेच महापालिकेची आवश्यक कर्तव्ये बजाविणेकरीता होणाऱ्या खर्चाची तरतुद करण्याकरीता मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात सद्यस्थितीमध्ये अंदाजे एकुण ३.५० लाख इतक्या मालमत्तांना कराची आकारणी करण्यात आलेली आहे.

मालमत्ता कराची मागणी देयक बजाविले नंतर मालमत्ता कराचा भरणा करणेकरीता अधिनियमान्वये विहित मुदत देण्यात येते. सदर विहित मुदतीत कराचा भरणा न करणाऱ्या मालमत्ता धारक यांना देयक बजावल्यानंतर अधिनियमातील प्रकरण ८ कराधान नियम चे कलम ४१ नुसार शास्तीची आकारणी करण्यात येते.

तथापी, मालमत्ता कराचा नियमीत व विहित मुदतीत कराचा भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना प्रोत्साहन देण्यासाठी आगाऊ कर भरणा-या मालमत्ता धारकांसाठी सवलत देणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मध्ये पुढील तरतुद आहे. "या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र मालमत्ता असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आगाऊ आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या भरण्यातून वापरकर्त्यांच्या वेगवेगळ्या वर्गाकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील."

यापूर्वी मा. प्रशासकीय सभा दि. १७/०४/२०२३ ठराव क्र. २४ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील जे मालमत्ता धारक सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरीता मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मालमत्ता धारक यांनी मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर बिलात विनिर्दिष्टीत केलेल्या दिनांकापुर्वी संपुर्ण वर्षाकरीता कराचा थकबाकीसह आगाऊ भरणा केल्यास चालु वर्षाच्या मालमत्ता करा मध्ये खालील तक्त्याप्रमाणे सवलत (सुट) देणे बाबत मान्यता देण्यात आलेली होती.

| अ. क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी चालु वर्षात करामध्ये (२०२३-२४) |
|---|---|---|---|
| १ | ३० जुन २०२३ पर्यंत | मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकरचरा शुल्क वगळुन इतर सर्व करावर | ५% |
| २ | ३१ जुलै २०२३ पर्यंत | | ३% |

साक्षांकित प्रत
(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सदर ठरावाच्या अनुषंगाने मालमत्ता कराच्या संगणकीय आज्ञावलीत नोंद घेऊन मालमत्ता धारकांना सवलत योजना लागू केली होती. व नागरीकांनी देखील त्यास चांगला प्रतिसाद दिला होता. व दि. ३१/०७/२३ पर्यंत रु. १०० कोटीची वसूली झाली होती.

सदर सवलत योजनेचा अनुभव पाहता सन २०२४-२५ या वर्षात संपूर्ण मालमत्ता कराचा आगाऊ भरणा केल्यावर चालु मागणीमध्ये खालील नमुद केल्याप्रमाणे सवलत/ सुट दिल्यास मालमत्ता धारक यांचेकडुन मालमत्ता

कर भरणा वेळेत करण्याकडे मालमत्ता धारकांचा कल वाढेल, त्यामुळे मालमत्ता कराचे उद्दीष्ट साध्य होण्यास मदत होईल. तसेच सदर आगाऊ कर भरणा प्राप्त झाल्यामुळे महानगरपालिकेला विकास कामासाठी सदर निधीचा वापर करता येईल.

| अ. क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी चालु वर्षात करामध्ये (२०२४-२५) |
|---|---|---|---|
| १ | ३० जुन २०४ पर्यंत | मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकचरा शुल्क वगळुन इतर सर्व करावर | ५% |
| २ | ३१ जुलै २०२४ पर्यंत | | ३% |

सबब, मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मधील तरतुदीनुसार सन २०२४-२५ या वर्षात मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर संपुर्ण मालमत्ता कराचा उपरोक्त तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे विहीत मुदतीत आगाऊ भरणा केल्यास चालु मागणी रक्कमेवर सवलत / सुट देणेकरीता मा. प्रशासक यांची मान्यता मिळावी.

## सर्वसाधारण सभा प्रशासकिय ठराव क्र. ३९५ दिनांक ७/३/२०२४

प्रशासनाने सादर केलेला गोषवारा विचारात घेवून आगाऊ मालमत्ता कर भरणा करणाऱ्या मालमत्ता धारक यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १४०-अ मधील तरतुदीनुसार सन २०२४-२५ या वर्षात मालमत्ता कराची देयक बजाविले नंतर विहीत मुदतीत मालमत्ता कराचा संपूर्ण कराचा भरणा करणाऱ्या नागरीकांना खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे सवलत (सुट) देण्यास मंजूर देणेत येत आहे.

| अ. क्रं. | कर भरणा कालावधी | कर शिर्षक | सवलत / सुट टक्केवारी चालु वर्षात करामध्ये (२०२४-२५) |
|---|---|---|---|
| १ | ३० जुन २०२४ पर्यंत | मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकरचरा शुल्क वगळुन इतर सर्व करांवर | ५% |
| २ | ३१ जुलै २०२४ पर्यंत | | ३% |

मालमत्ता कर विभागाने वरील तक्त्यात नमुद केल्यानुसार विहीत कालावधीत मालमत्ता कराचा भरणा करण्याऱ्या नागरीकांना मालमत्ता करात सवलत देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच या करीता मालमत्ता कराच्या संगणकीय आज्ञावलीत उचित बदल करण्यात यावे.

साक्षांकित प्रत

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका